# करडी लागवड तंत्रज्ञान

कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ. (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला)

---

**महत्वाचे मुद्दे**

१. कोरडवाहू भागातील रबी हंगामातील करडी हे महत्वाचे पीक आहे. हे पीक खरीप हंगामातील जमिनीत साठवलेल्या उपलब्ध ओलाव्यावर घेतल्या जाते. करडीची मुळे जमिनीत खोलवर जात असल्या कारणाने खालच्या स्थरातील ओलावा पिकाच्या वाढीसाठी वापराला जातो. त्यामुळे हे पीक अवर्षण परिस्थितही चांगले येते पीकवाढीच्या कोणत्याही अवस्थेत जास्त पाऊस आणि पाणी साचून राहणे या पिकास मानवत नाही. त्याचप्रमाणे अति उष्णतामानाचा आणि अति थंडीचा या पिकावर विपरीत परिणाम होतो.

२. हे पीक मुख्यत्वे कोरडवाहू परिस्थितीत घेतल्या जाते. परंतु ओलिताची सोय असल्यास पेरणीनंतर ३०, ५० आणि ६५ दिवसांनी ओलिताच्या तीन पाळया दिल्यास अधिक उत्पन्न मिळते.

३. सोयाबीन काढल्यानंतर उपलब्ध ओल्याव्यावर कुठलीही वाही न करता हे पीक घेता येते.

४. अति खोलवर किंवा अति उथळ पेरणी केल्यास उगवण होत नाही. म्हणून योग्य ओलावा पाहून योग्य खोलीवर पेरणी करावी.

५. मुग, उडीद यानंतर हे पीक हमखास येते.

६. खारपाण पट्ट्यात देखील हे पीक चांगले येते.

७. करडी पिकास काटे असल्यामुळे जानावरांपासून त्रास कमी होतो

**जमीन:**

- करडई पिकासाठी मध्यम ते खोल भारी जमीन निवडावी.
- ६० से.मी. पेक्षा जास्त खोल जमिनीत ओलावा जास्त काळ टिकून राहतो
- जमीन पाण्याचा चांगला निचरा होणारी असावी. पाणी साठून राहिल्यास पिकास अपाय होतो.
- करडई पीक काहीशा क्षारयुक्त व चोपण जमिनीतही येते.

**पूर्वमशागत:**

- करडीचे पीक एकच घ्यावयाचे असल्यास उन्हाळयात एकवेळ नांगरावी, वखरणीच्या २-३ पाळया देऊन काडीकचरा वेचून जमीन भूसभूसित करावी. पावसाळ्यात वखरणी चालू ठेवावी जेणेकरून पाणी जीरवून तणनियंत्रण होईल. खरीप हंगामात सपाट वाफे किंवा उतारास आडवे सरी वरंबे करून मुलस्थानी जलसंधारण करावे.
- दुबार पीक घ्यावयाचे असल्यास खरीप पिकाचे काढणीनंतर कमीत कमी मशागत करून जमीन पेरणीस तयार करावी. जेणेकरून ओलावा टिकून राहील.

- उपलब्ध असल्यास शेवटच्या पाळीपूर्वी जमिनित ५—६ टन शेणखत किंवा कम्पोस्ट खत द्यावे
- भात खाचरात जास्त मशागत न करता लवकर येणाऱ्या धानानंतर लागवड करता येईल.

**बियाणे व बीजप्रक्रिया:**

- लागवडीसाठी करडईचे सुधारित वाणाचे प्रमाणित बियाणे निवडावे.
- पेरणीसाठी प्रती हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे.
- खरीप पिकानंतर त्याच क्षेत्रात करडई पीक घ्यायचे असल्यास १२ ते १५ किलो बियाणे वापरावे.
- पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्राम बाविस्टीन /किलो किंवा ट्रायकोडर्मा ४ ते ५ ग्राम प्रती किलो बियाणे याप्रमाणास लावावे.
- त्यानंतर अझोटोबक्टोर या जीवाणू संवर्धकाची २५ ग्राम प्रती किलो बियाणे बीज प्रक्रिया करावी.
- तसेच २५ ग्राम प्रती किलो बियाणे पी.एस.बी. या स्फुरद विरघळनाऱ्या जीवाणू संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी.

**पेरणी व पेरणी अंतर :**

- कोरडवाहू करडईची पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी म्हणजे बी आणि खत एकाच वेळी पेरता येते.
- पेरणी करतांना दोन ओळीतील अंतर ४५ से.मी. ठेवावे व दोन झाडातील अंतर २० से.मी. राहील अशा रीतीने पेरणी करावी.
- कोरडवाहू पेरणी १५ ऑक्टोबर पर्यंत आटोपावी. ओलिताखालील पेरणी १५ नोव्हेंबर पर्यंत करावी.
- कमी कालावधीच्या भात पिकानंतर किंवा परिव धान पिकानंतर करडी लावायची असल्यास एक किंवा दोन संरक्षित ओलिताचे नियोजन करावे.
- जमिनीत ओलावा नसेल तर पेरणीनंतर लगेचच स्प्रिंकलर लावून उगवणीसाठी ओळीत करावे..

**सुधारित वाण**

- पिडीकेव्ही व्हाईट (एकेएस-351)
- एकेएस-२०७
- पिकेव्ही पिंक (एकेएस-३११)

**रासायनिक खत मात्रा व वेळ:**

- हे पीक रासायनिक खतास उत्तम प्रतिसाद देते.
- कोरडवाहू पिकास पेरणीसोबत ४० किलो नत्र (८७ किलो युरिया किंवा १९४ किलो अमोनिम सल्फेट ) व २५ किलो स्फुरद (१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट ) प्रती हेक्टर द्यावे.
- बागायती करडई पिकास प्रती हेक्टरी ७५ किलो नत्र (१६३ कोलो युरिया ) अधिक ३७.५ किलो स्फुरद (२३५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) द्यावे. जमिनीत potash chi कमतरता असल्यास हेक्टरी २० किलो पालाश द्यावे.

- करडी पीक तेलवर्गीय पीक असल्यामुळे व सिंगल सुपर फॉस्फेट वापरले नसल्यास २० किलो गंधक प्रती हेक्टरी वापरावे.

**विरळणी:**

करडई पिक साठवलेल्या ओलाव्यावर घेतले जाते त्यामुळे विरळणी करून झाडांची योग्य संख्या ठेवणे महत्वाचे आहे.

- पेरणीनंतर १५ ते २० दिवसाचे आत विरळणी करावी.
- विरळणी करतांना २० से.मी. अंतरावर  एक जोमदार रोप ठेवून विरळणी करावी.
- हेक्टरी झाडांची संख्या ७५००० ते १ लाखापार्यात ठेवावी.

**आंतरमशागत:**

- गरजेनुसार पिकाची खुरपण करून शेत स्वछ ठेवावे.
- पेरणीनंतर तिसऱ्या आठवड्यात पहिली कोळपणी करावी.
- कोळपणीमुळे जमिनीवर मातिचे आच्छादन तयार होते व जमिनीच्या भेगवाटेद्वारे ओलाव्याचे होणारे बाष्पीभवन रोखले जाते.
- हा ओलावा पिकाच्या वाढीसाठी उपयोगी पडतो.
- करडीला भर देणे आवश्यक आहे त्यामुळे दुसऱ्या कोळपणीपासून डवऱ्याला दोरी बांधून कोळपणी करावी.

**पिकास संरक्षित पाणी देणे:**

- करडई हे पिक अवर्षण प्रतिकारक असल्यामुळे या पिकाच्या वाढीस पाणी की लागते.
- ओलितासाठी पाणी उपलब्ध असेल तर पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी पहिले पाणी द्यावे.
- पाणी जमिनीस भेगा पडण्यापूर्वी द्यावे.
- ५० ते ५५ दिवसांनी दुसरे पाणी द्यावे.
- पिकात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी.
- पाणी देतांना हलके पाणी द्यावे. शक्यतो स्प्रिंकलर ने पाणी द्यावे.
- जर वाढ जास्त असेल तर पेरणीनंतर ५५-६० दिवसांनी सायकोसील (लीओसील) या वाढ रोधकाची १००० पीपीए (१००० मिली  ५०० लिटर पाण्यात ) प्रमाणे फवारणी केली असता उत्पादनात वाढ होते.
- दोन तासाच्या आड दांड काढून पाणी द्यावे. झाडांना पाण्याचा स्पर्श होण्याची किंवा झाडाच्या अगदी बुडाशी पाणी देण्याची गरज नाही.
- एकाच ओलिताची सोय : ५० दिवसांनी
- दोन ओलिताची सोय  :  ३० व ५० दिवसांनी
- तीन ओलिताची सोय : ३०, ५० व ६५ दिवसांनी

**तण व्यवस्थापन:**

- २५ व ४० दिवसांनी डवरणी व निंदनीची शिफारस
- करडई पिकामध्ये गवत वर्गीय व रुंद पाने वर्गीय तण व्यवस्थापनासाठी अनेक उगवणपूर्व तणनाशकांची नोंदणी करण्यात आली आहे.
- गवतवर्गीय तण नियंत्रणासाठी उगवण पाश्चात तणनाशके जसे डीक्लोफोप-मेथील व प्रोप्याक्वीझोफोप तणनाशकांची नोंदणी करण्यात आली आहे.
- पेरणीपूर्वी : फ्लुक्लोऱ्यालीन (बासालीन) –२ ली. ६०० ते ७०० ली. पाणी
- उगवणपूर्व: पेंडीमेथीलीन ४४० ग्राम/ली /stomp ४४०ग्राम/ली. (५० ते ६० मिली १० ली. पाणी)
- उगवण पत्चात (Early post emergence) प्रोप्याक्वीझ्याफोप १०० ग्राम/ली (शोगुन), for grassy weeds. 3 to 4 leaf stage of weeds or 15 to 20 Days of sowing

**कापणी व मळणी:**

- करडई पिक १२० ते १४० दिवसात तयार होते.
- करडईची काढणी पाने व बोंडे पिवळी पडल्यानंतर काढणी करावी
- काढणी सकाळच्या वेळेस करावी. सकाळी आद्रतेचे प्रमाण जास्त असल्याने करडईचे काटे नरम पडतात.
- पिक चांगले उन्हात वाळवून मग काठीने किंवा मळणी करावी.
- अलीकडे कंबाइन हार्वेस्टरमुळे काढणी सुकर झाली आहे.
- या यंत्रामुळे काढणी व मळणीची कामे सोपी व सुटसुटीत झाली असून कमी वेळात काढणी होते.
- त्याचप्रमाणे कारडीच्या झाडाचे बारीक बारीक तुकडे होऊन शेतात विखुरले जात असल्यामुळे जमिनीत मिसळून कुजल्यामुळे त्यापासून चांगले सेंद्रिय खत मिळते.
- बिया वाळवून साठवून ठेवाव्यात.
- For seed production and good germination hand threshing may be recommended.